# विपश्यना

साधक

साधकांचे
मासिक प्रेरणा पत्र

वार्षिक शुल्क रु. 30/-
आजीवन शुल्क रु. 500/-

बुद्धवर्ष २५५८, मार्गशीर्ष पौर्णिमा, ६ डिसेंबर, २०१४ वर्ष १ अंक ८

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः - http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


**धर्मवाणी**

**अप्पमत्तो पमत्तेसु, सुत्तेसु बहुजागरो।**
**अबलस्संव सीघस्सो, हित्वा याति सुमेधसो॥**

*धम्मपद- २९, अप्पमादवग्गो.*

प्रमाद करणाऱ्यात अप्रमादी (क्षीणास्त्रव) व (अज्ञानाच्या निद्रेत) झोपलेल्या लोकात अतिजागृत प्रज्ञावान (दुसऱ्यांना) मागे टाकून (असा पुढे निघून जातो) जसा शीघ्रगामी अश्व दुर्बळ अश्वास.

## 'त्रिपिटकात सम्यक संबुद्ध' ची भूमिका

८३६ पृष्ठ व सहा भागात छापलेले पुस्तक 'त्रिपिटकात सम्यक संबुद्ध' वस्तुतः विशाल त्रिपिटकाची भूमिकाच आहे. दीर्घ भूमिका आहे, जिला वाचकांच्या वाचन सुवेधेसाठी सहा भागात प्रकाशित केले गेले आहे. यासाठी अजून एक छोटीशी भूमिका लिहिणे आवश्यक समजले गेले. याच्या परिणाम स्वरूपात हे काही शब्द आहेत.

**सुत्तन्तेसु असन्तेसु, पमुट्ठे विनयम्हि च।**
**तमो भविस्सति लोके, सूरिये अत्थङ्गते यथा॥**

- धर्मसूत्र विद्यमान नसल्यावर व धर्मपालन (करण) विसरल्यावर जगात सूर्यास्ताप्रमाणे अंधकार पसरतो.

**सुत्तन्ते रक्खिते सन्ते, पटिपत्ति होति रक्खिता।**
**पटिपत्तियं ठितो धीरो, योगक्खेमा न धंसति॥**

*(अङ्गुत्तरनिकायअट्ठकथा१.१.१३०,दुतियपमादादिवग्गवण्णना)*

- धर्मसूत्र सुरक्षित राहिल्यावर पतिपत्ती म्हणजे साधनेचे प्रतिपादन सुरक्षित राहाते. प्रतिपादनात लागलेला धैर्यवान योगक्षेमापासून वंचित होत नाही.

------------

जवळपास चाळीस वर्षापूर्वी सप्टेंबर, १९५५ मध्ये मी पहिल्यांदा परम पूज्य गुरुदेव सयाजी ऊ बा खिन यांच्या चरणात बसून विपश्यनेच्या शिबिरात भाग घेतला. तेव्हा हे पाहून सुखद आश्चर्याने प्रभावित झालो की भगवान बुद्धांचे हे प्रयोगात्मक प्रशिक्षण किती निर्मळ आहे, निर्दोष आहे ! किती निष्कपट आहे, निष्कलंक आहे ! किती सार्वजनिक आहे, सार्वभौमिक आहे ! किती सार्वकालिक आहे, सनातन आहे व किती वैज्ञानिक व त्वरित फळ देणारे आहे !

लहानपणापासून हे ऐकत व मानत आलो होतो की भगवान बुद्ध ईश्वराचे नववे अवतार आहेत. या कारणामुळे आमच्यासाठी पूज्य आहेत, त्यामुळे भगवान बुद्धांप्रती सहज श्रद्धा होती. घरातील मोठ्या वयस्करांसोबत मांडलेत (ब्रह्मदेश) भगवान बुद्धांच्या महामुनी मंदिरात जाऊन त्यांच्या प्रतिमेच्या शांत, सौम्य, स्निग्ध चेहेऱ्याचे दर्शन करून, सादर नमन करणे व अत्यंत भक्तिभावाने फूल चढवणे व दीप लावणे खूप प्रिय वाटायचे. परंतु सोबतच लहानपणात मनावर हाही एक लेप लावला गेला होता की भगवान बुद्ध परम पूज्य व वंदनीय आहेत, तरीही त्यांची शिकवण आमच्यासाठी ग्राह्य नाही, योग्य नाही. ही मान्यता किती खोटी सिद्ध झाली.

नक्कीच एखाद्या जुन्या पुण्याचा फलोदय झाला, ज्यामुळे अशी परिस्थिती उत्पन्न झाली की दहा दिवसांसाठी विपश्यना मातेच्या सुखद मांडीवर जाऊन बसलो. काम, क्रोध व अहंकाराच्या अंतर तापामुळे सतत तापित, संतापित राहाणाऱ्या मनाला दहा दिवसात जी शांती मिळाली, त्यामुळे हर्षविभोर झालो. शिबिरात सामील होण्यापूर्वी परम पूज्य गुरुदेवांनी विपश्यना विद्येची जी रूपरेखा समजवली, ती खूप निर्दोष वाटली. परंतु लहानपणापासून लागलेल्या जुन्या लेपांमुळे मनात काही संकोच होताच. परंतु दहा दिवस पूर्ण झाल्यावर हे पाहून मन खूप प्रसन्न झाले, संतुष्ट झाले की या मार्गात कुठेही काहीही दोष नाही. विपश्यनेचा सारा मार्ग शुद्ध व निर्दोष आहे. त्यामुळे गृहस्थ असो वा संन्यासी सर्वांसाठी सर्वथा ग्राह्य आहे, उपयोगी आहे.

भगवान बुद्धांच्या अशा निर्दोष शिकवणुकीच्या प्रती मनात ज्या अनेक मिथ्या भ्रांती होत्या, त्यांचे निराकरण झाले. शेवटी शील सदाचाराचे जीवन जगण्यात काय दोष आहे बरे? सहज स्वाभाविक श्वासाच्या येण्या-जाण्याप्रती सतर्क राहून चित्ताला एकाग्र करून समाधिस्थ होण्यात काय दोष आहे बरे? शरीर व चित्ताच्या पारस्परिक प्रभाव क्षेत्राचे यथार्थ दर्शन करत, अंतर्मनाच्या सखोलतेत विकारांचे व त्यामुळे होणाऱ्या व्याकुळतेच्या प्रजनन व संवर्धनाचे निरीक्षण करत, या प्रपंचाप्रती अनित्यबोधिनी प्रज्ञा जागवण्यात काय दोष आहे बरे? या अनुभवजन्य प्रज्ञेच्या आधारावर समतेत स्थिर होऊन मनाला विकार विमुक्त बनवण्यात व अशा निर्मळ चित्त झालेल्या साधकाद्वारे इंद्रियातीत नित्य, शाश्वत, ध्रुव अवस्थेचा साक्षात्कार करू शकण्याची क्षमता प्राप्त करण्यात काय दोष आहे ? या निर्दोष मार्गावर चाललेले प्रत्येक पाऊल कल्याणकारी आहे.

एका धर्मभीरू परिवारात जन्मलो व वाढलो, या कारणामुळे खूप समजत होतो की शील-सदाचाराचे पालन अवश्य केले पाहिजे. यासाठी आवश्यक मनोबल वाढवण्याची विधी या शिबिरात शिकलो. चित्ताची एकाग्रता व विकार विमुक्तीचे लक्ष तर पूर्वीही होते, परंतु याला पूर्ण करू शकण्याचा सहज सरळ मार्ग या विधीने प्रशस्त केला. प्रज्ञेच्या बाबतीत खूप वाचले होते, खूप चिंतन-मननही केले होते, परंतु यामुळे जो लाभ मिळावयास पाहिजे होता, त्यापासून वंचित होतो. प्रज्ञेचा खरा अर्थच समजू शकलो नव्हतो तर लाभ मिळेलच कसा ? आतापर्यंत तर परोक्ष ज्ञानालाच प्रज्ञा समजत होतो. ऐकलेले, वाचलेले ज्ञान वस्तुतः श्रुतज्ञान असते, ज्याला श्रद्धेद्वारे स्वीकार केले जाऊ शकते. चिंतन-मनन करून त्याला योग्य मानले तर तेच चिंतनज्ञान होते. परंतु ही दोन्हीही परोक्ष ज्ञान आहेत, परकी, दुसऱ्यांची ज्ञान आहेत. स्वानुभूतीच्या स्तरावर प्रत्यक्ष ज्ञानच तर प्रज्ञान आहे. हीच प्रज्ञा आहे. विपश्यनेद्वारे या प्रत्यक्ष ज्ञानाचा अभ्यास केला. या अभ्यासाची निरंतरता कशी कायम ठेवायची, हेही शिकलो. या निरंतरतेत पुष्ट होणेच प्रज्ञेत स्थित होणे आहे, हेही खूप चांगले समजले. तेव्हा असे वाटले की ज्या स्थितप्रज्ञतेला आपल्या जीवनाचा आदर्श मानला होता, ती तर केवळ एक सैद्धांतिक बाब होती. खूप झाले तर त्यावर चिंतन-मनन केले.

परंतु तिही केवळ बौद्धिक प्रक्रियाच झाली. विपश्यनेने प्रज्ञेच्या व्यावहारिक पक्षाचा प्रयोगात्मक मार्ग मोकळा केला. प्रज्ञाबळाने वीतराग, वीतद्वेष, वीतमोह, वीतभय होण्याचा व्यावहारिक पक्षाचा प्रयोगात्मक मार्ग प्रशस्त केला. विपश्यना कोरा उपदेश नाही, कोरे चिंतन-मनन नाही, तर मनोविकारांना मुळापासून काढण्याची व्यावहारिक प्रक्रिया आहे, याचा स्पष्ट अनुभव आला.

पहिल्याच शिबिरात शील, समाधी व प्रज्ञेच्या विशुद्ध सुधारसाचा जो थोडासा स्वाद चाखला व त्यामुळे जो आंतरिक प्रश्रब्दी व प्रशांतीचा अनुभव झाला, त्यामुळे मनात एक धर्मसंवेग जागला की चित्त विशुद्धीच्या या कल्याणकारी साधनेच्या अभ्यासाला पुष्ट करत, याच्या सैद्धांतिक पक्षालाही जाणले पाहिजे. त्यामुळे बुद्धवाणी वाचण्याचा निश्चय केला. परंतु ती जवळपास पंधरा हजार पृष्ठांच्या विशाल साहित्यात लिहिलेली होती. तसेच ती पाली भाषेत होती, जिचे मला थोडेसेही ज्ञान नव्हते. सौभाग्याने महापंडित राहुल सांकृत्यायनजी, भिक्षु आनंद कौसल्यायनजी, भिक्षु जगदीश काश्यपजी, भिक्षु धर्मरत्नजी व भिक्षु धर्मरक्षितजींनी बुद्धवाणीच्या काही ग्रंथांचे हिन्दी भाषेत अनुवाद केले होते. त्यांना भारतातून मागवून वाचणे आरंभ केले. वाचतांना खूप प्रसन्नता वाटायची, विपश्यना साधनेला खूप बळ मिळायचे.

सन १९६२ ते ६४ च्या दरम्यान एका अजून महान पुण्याचा फलोदय झाला, ज्यामुळे व्यवसाय व उद्योगाच्या संचालनासंबंधी उत्तरदायित्वापासून पूर्णपणे मुक्ती मिळाली. आता जीवनात रिकामा वेळच वेळ होता. सन १९६९ पर्यंत बुद्धवाणीच्या हिंदी अनुवादालाच नाही, तर मूळ पालीच्या काही सूत्रांनाही वाचण्याची संधी प्राप्त झाली. मूळ पालीत या सूत्रांना वाचतांना अत्यंत प्रीती-प्रमोद जागायचा, तन-मन पुलक-रोमांचाने भरुन जायचे. सामान्यतः पालीभाषा खूप सरळ वाटली, प्रिय वाटली व प्रेरणादायकही. त्या सूत्रांच्या परम पूज्य गुरुदेवांद्वारे केल्या गेलेल्या व्याख्येचा मनावर खूप सखोल प्रभाव पडला. त्या व्याख्येच्या आधारावर विपश्यना साधनेचा अभ्यास करतांना जो अनुभव झाला, तो अद्‌भुत होता, अपूर्व होता. परियत्ती म्हणजे बुद्धवाणी व पतिपत्ती म्हणजे त्याचा सक्रिय अभ्यास, यांच्या पावन संगमामुळे धर्माचे शुद्ध स्वरूप अधिक उजागर होत गेले. या अमृतसागरात बुडी मारतांना पाहिले की विपश्यनेचा मार्ग अत्यंत शुद्ध आहे, पवित्र आहे, सुखशांतिदायक आहे. जातीपातीच्या भेदभावापासून, सांप्रदायिक बेड्यांपासून, गुंतवणाऱ्या दार्शनिक मान्यतांपासून व पोकळ कर्मकांडांपासून सर्वथा मुक्त आहे. या मार्गावर उचलले गेलेले प्रत्येक पाऊल कोणाही व्यक्तीसाठी इथेच याच जीवनात विकार विमुक्तीचे सुखद परिणाम देणारे आहे.

मला वाटले की कल्याणकारी बुद्धवाणी व भगवती विपश्यनेला गमावून आमचा देशा आपली एक अत्यंत गौरव, गरिमामय पुरातन अध्यात्मविद्या घालवून बसला. शुद्ध सनातन आर्यधर्म गमावला. भारताच्या त्या ऐतिहासिक महापुरुषाला घालवून बसला. जे नितांत निष्कपट होते, निष्प्रपंच होते, निष्कलुषित होते. जे अनंत मैत्री व करुणेचे साक्षात अवतार होते. एक अशा महामानवाला गमावले जे केवळ भारतातच नाही तर संपूर्ण विश्वात अनुपम होते, अनुत्तर होते, अप्रतिम होते, अद्वितीय होते, असदृश होते. ज्यांच्या पावन शिकवणुकीमुळे भारत वस्तुतः विश्व गुरु बनला. भारताची भूमी विश्वाच्या करोडो लोकांसाठी पूजनीय तीर्थभूमी बनली. त्या भगवान गौतम बुद्धांना व त्यांच्या कल्याणी वाणीला तसेच दुःख-विमोचनी विपश्यना विद्येला पुन्हा प्रकाशात आणणे आमच्यासाठी सवर्था लाभप्रदच लाभप्रद आहे.

जवळपास २००० वर्षाच्या दीर्घ कालावधीनंतर सौभाग्याने सन १९६९ मध्ये विपश्यनेचे भारतात पुनरागमन झाले आहे. भारताच्या प्रबुद्ध लोकांनी हिचा सहर्ष स्वीकार केला आहे. साधकांची संख्या दिवसेंदिवस वाढत जात आहे. पाहातो की विपश्यना शिबिरात सामील होणारे अनेक साधक भगवान बुद्धांच्या मूळ उपदेशांशी अवगत होऊ इच्छितात. मी त्यांच्या या धर्म जिज्ञासेला चांगला समजू शकतो, कारण मी स्वतःही या अवस्थेतून गेलो आहे. हेही जाणतो की आजच्या भारतात पालीभाषेत बुद्धवाणी उपलब्ध नाही. नव नालंदा महाविहाराने जवळपास ३५ वर्षापूर्वी जे प्रकाशन केले होते, ते आता सर्वथा अनुपलब्ध आहे. परंतु ही प्रसन्नतेची बाब आहे की विपश्यना विशोधन विन्यासाने केवळ बुद्धवाणीच नाही तर त्याच्या अर्थकथा, टीका व अनुटीकांच्या संपूर्ण पालीसाहित्याच्या प्रकाशनाचा निश्चय केला आहे. परंतु सर्व साधक तर पाली वाचू शकत नाहीत. हिंदी भाषी साधकांसाठी हिंदी अनुवाद आवश्यक आहेत. जे अनुवाद पूर्वी झाले होते, दुर्भाग्याने त्यापैकी अधिकांश आता उपलब्ध नाहीत. विपश्यना विशोधन विन्यासची एक योजना पुरातन पाली साहित्याचा हिंदी अनुवाद करण्याचीही आहे, परंतु त्याला खूप वेळ लागेल.

त्यामुळे आपल्या सामर्थ्य सीमेला जाणूनही त्रिपिटकाची एक मोठी भूमिका लिहिण्याचे साहस केले, ज्यामुळे साधकांना हिंदी भाषेत भगवान बुद्ध व त्यांच्या शिकवणुकीबाबत जास्तीतजास्त व खरी-खरी माहिती मिळू शकेल. पाली त्रिपिटकातून काही अवतरण व प्रेरक प्रसंगांना एकत्र करू लागलो. मी जाणतो की आजच्या साधकांची तीच अवस्था आहे जी १९५५ मध्ये माझी होती. भगवान बुद्ध व त्यांच्या पावन शिकवणुकीबाबत त्यांचे ज्ञान अत्यल्प आहे व भ्रामकही. त्या भ्रांतींना दूर करण्यासाठी मूळ पालीत सुरक्षित बुद्धवाणीचाच आश्रय घेणे आवश्यक आहे. पाली भाषाच आम्हाला भगवान बुद्धांच्या जवळ पोहोचवते कारण ही त्यांची मातृभाषा कोशली होती, जी तत्कालीन विस्तृत व शक्तिशाली कोशल देशाची जनभाषा असल्यामुळे त्या संपूर्ण मध्यदेशात बोलली व समजली जात होती, जी भगवान बुद्धांची चारिका भूमी झाली. कालांतराने हिला सम्राट अशोकाने आपल्या प्रशासन व धर्मलेखांसाठी स्वीकारले कारण त्याची राजधानी पाटलिपुत्र मगधात होती व कोशल प्रदेशही मगध साम्राज्यात सामावला गेला होता. त्यामुळे हीच कोशली भाषा मागधी म्हणवली जाऊ लागली. हिने भगवान बुद्धांची वाणी सांभाळून ठेवली, पालन करुन ठेवली म्हणून पाली म्हणवली गेली.

या सुरक्षित वाणीत सर्वत्र भगवान बुद्धांचे धर्मकायिक व्यक्तित्व सामावले आहे. त्यांच्याद्वारे प्रवाहित धर्माच्या अमृतवाणीचा कलकल निनाद सामावला आहे. त्यांच्या वाणीने प्रभावित होऊन व त्यांच्या सांगितलेल्या मार्गावर चालून संतुष्ट झालेल्या गृहत्यागी व गृहस्थांच्या आदर्श जीवनाचे भव्य दर्शन सामावले आहे, जे साधकांसाठी खूप प्रेरणादायक आहे.

त्रिपिटकात त्यांच्याशी संबंधित प्रेरक सामग्री इतकी अधिक मात्रेत आहे की कोणी कितीही निवड करेल तरी तृप्ती होऊ शकत नाही. तसेच जसे की भगवान बुद्धांच्या जीवनकाळात त्यांचे गृहस्थ शिष्य हत्थक आळवकांनी म्हटले होते की –

“भगवान, मी आपले दर्शन करत-करत अतृप्तच राहिलो.”

“भगवान, मी आपली वाणी ऐकत-ऐकत अतृप्तच राहिलो.”

त्रिपिटक भिन्न-भिन्न प्रकारच्या सुंदर व सुगंधित पुष्पांचे मोठे मनोहर उद्यान आहे. मी त्यापैकी थोडीशी फूल निवडून त्यांची माला गुंफण्याचा प्रयत्न केला आहे. कुठे-कुठे अर्थकथांमधूनही बुद्धपुत्रांच्या वाणीचे एखादे दुसरे सुंदर फुल घेऊन गुंफलेले आहेत. हे सर्व तसेच झाले जसे की भगवान बुद्धांच्या गुणांचे गान करत भावविभोर गृहपती उपालीने म्हटले होते –

**सेय्यथापि, भन्ते, नानापुप्फानं महापुप्फरासि**

– जसे भंते, नाना प्रकारच्या पुष्पांची एक मोठी पुष्पराशी असावी,

**तमेनं दक्खो मालाकारो वा मालाकारन्तेवासी वा**

- ज्यातून एखादा दक्ष माळी अथवा त्या माळ्याचा शिष्य,

**विचित्तं मालं गन्थेय्य -** सुंदर दिसणारी माला गुंफेल.

**एवमेव खो, भन्ते, सो भगवा अनेकवण्णो, अनेकसतवण्णो**

- याच प्रकारे भंते, ते भगवान अनेक प्रशंसनीय गुण असणारे आहेत, अनेक शत प्रशंसनीय गुण असणारे आहेत.

**को हि, भन्ते, वण्णारहस्स वण्णं न करिस्सति?**

*(मज्झिमनिकाय २.७७, उपालिसुत्त)*

- भंते, प्रशंसनीयाची प्रशंसा कोण करणार नाही? गुणवंतांचे गुण कोण गाणार नाही?

त्याच गुणवंत भगवानांचे, त्यांच्या शिकवलेल्या धर्माचे, त्या धर्माला धारण करून निर्मळ चित्त झालेल्या संतांचे गुण गाण्याची इच्छा माझ्या अंतर्मनातही जागणे स्वाभाविक होती.

याच भावाने बुद्धवाणीच्या काही सुंदर सुगंधी सुमनांना निवडून ही माला गुंफली गेली आहे; सद्धर्माच्या अगाध रत्नाकरातून काही अनमोल रत्न निवडून हे रत्नखचित आभूषण घडवलेले आहे; सद्धर्माच्या असीम सुधासागरातून अमृताचे काही थेंब घेऊन धर्मसुधारसाची ही घागर भरली गेली आहे.

नित्य पठनीय ही पुस्तकमाला भगवानांबाबत निरुपित या गुणांचे - **इतिपि सो भगवा अरहं सम्मासम्बुद्धो विज्जाचरण सम्पन्नो सुगतो लोकविदू अनुत्तरो पुरिसदम्मसारथि सत्था देवमनुस्सानं बुद्धो भगवा'ति;** इत्यादी मराठी निरूपण आहे.

कंप्युटर व काही साधकांच्या सहयोगाने सहा भागांच्या शेवटी दिली गेलेली प्रयुक्त शब्दांची अनुक्रमणिका छापलेली आहे. जसे -

- हिंदी शब्दानुक्रमणिका, - पाली शब्दानुक्रमणिका,

- संदर्भ सूची, - नावांची अनुक्रमणिका इत्यादी, संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व जिज्ञासूंसाठी खूप उपयोगी आहेत.

ही सुंदर सुरभित सुमनांची माला, हे किमती रत्नजडित स्वर्णाभूषण, ही शांतिदायिनी सुधारस घागर, विपश्यी साधकांना व निरनिराळ्या शांतिप्रेमी पाठकांना धर्मपथावर आरूढ होण्यासाठी व उत्तरोत्तर पुढे चालत राहण्यासाठी -

विपुल प्रेरणेचे कारण बनो<br>
त्यांच्या अपरिमित हितसुखाचे कारण बनो !<br>
त्यांच्या असीम मंगलकल्याणाचे कारण बनो !<br>
त्यांच्या स्वस्तीमुक्तीचे कारण बनो !<br>
हीच कल्याण कामना आहे.

कल्याणमित्र<br>
सत्यनारायण गोयन्का

(बुद्ध जयंती, १९९५)

------------

## दीपावली नववर्षाचे प्रश्नोत्तर

**प्रश्न-** सत्कर्माचे ज्ञान झाले परंतु कार्य होत नाही, मनात दृढता राहात नाही. आळस व लोभ मनात आहेत.

**उत्तर-** जे ज्ञान झाले ते केवळ बुद्धीच्या स्तरावर झाले. अनुभूतीच्या स्तरावर ज्ञान होणे सुरू होईल तर बळ प्राप्त होणे सुरू होईल. मनात दृढता येईल. आता आम्हाला प्रत्येक अवस्थेत समतेत स्थापित राहावयाचे आहे. ही दृढता अनुभूतींच्या स्तरावर यावी. विपश्यना करत रहाल व समजून उमजून करत रहाल तर आपोआप दृढता येईलच.

**प्रश्न-** व्यावहारिक जगात लहानपणापासूनच मुलांना नमन व प्रार्थनेद्वारे संप्रदाय व ईश्वराप्रती श्रद्धा शिकवली जाते.

**उत्तर-** काहीही वाईट बाब नाही. काय झाले जर कोणाला एखाद्या ईश्वराप्रती श्रद्धा जागली, एखाद्या देवी, देवतेप्रती श्रद्धा जागली. आता त्याला शिकवायचे हे आहे की का श्रद्धा जागली? याला देवता का मानतात? हिला देवी का मानतात? याला ईश्वर का मानतात? याच्यात काही सदगुण आहेत. जर सद्गुण नाहीत, दुर्गुणच दुर्गुण आहेत, तर आमच्या श्रद्धेला पात्र कसा झाला ? का श्रद्धा करावी त्याच्यावर? सद्गुणच सद्गुण आहेत तर अरे, असे सद्गुण माझ्यातही आले पाहिजेत ना? आम्ही ज्याला जगतपिता म्हणतो, जगतमाता म्हणतो, ते आमचे पिता झाले, आमची माता झाली. कोणाचीही माता, कोणाचेही पिता केव्हा आनंदी होतील, जेव्हा मुलात ते सद्गुण येतील जे माता-पित्यात आहेत. ते सद्गुण मुलात आले नाहीत व माता-पित्याला तो आनंदी करू इच्छित असेल, तर कसे आनंदी होतील माता-पिता. एवढीशी बाब मुलांना समजवावी की ज्या परिवारात ज्या कुलदेवतेला मानत असतील, कुलदेवीला मानत असतील, जरी कोणी ईश्वराला मानत असतील, परमात्म्याला मानत असतील, अल्लाला मानत असतील... त्यांच्यात गुण काय आहेत? बस तोच धर्म आहे. ते गुण माझ्यात येत आहेत की नाहीत? हाच धर्म आहे. लहानपणापासून त्यांना शिकवणे सुरू कराल तर बदलत जातील. पुढे जाऊन अनुभूती करेल तर लक्षात येईल की सत्यच ईश्वर आहे, परम सत्यच परमेश्वर आहे. त्याचा साक्षात्कार झाला पाहिजे, केवळ पोकळ चर्चा नको.

**प्रश्न-** माझा प्रश्न व्यक्तिगत आहे. माझा धंदा वकिलीचा आहे. मला भिती वाटते की ही सम्यक आजीविका आहे काय? कोणाच्या दुःखापासून, त्रासापासून पैसे मिळवणे सम्यक आहे? दोन्ही पक्षांशी मैत्रीभाव ठेवावा तर अशिलाप्रती न्याय-अन्याय कसा होईल ? कृपया समजवावे.

**उत्तर-** खूप चांगला प्रश्न आहे, व्यावहारिक प्रश्न आहे. आमच्या गुरुजींसमोर एक असाच वकील आला. त्याने साधना केली. तर तो म्हणतो की आमच्याजवळ असेच अशील आहेत जे चुका करून येतात व आम्हाला म्हणतात की नियमांची अशी काही गुंतागुंत शोधा की आम्ही सुटून जाऊ. आम्ही आपल्या बुद्धिने एखादा रस्ता काढतो आणि ते सुटतात. त्यामुळे खूप नाव आहे त्याचे. कोणत्याही प्रकारची केस असो तरी तो जिंकेल, इतका प्रसिद्ध वकील आहे. तर म्हणतो की मी आपल्या उपजीविकेचे साधन कसे सोडून देऊ? तेव्हा गुरुजी म्हणाले, तू केवळ वर्षभरासाठी सोड. तुझ्याजवळ ज्या काही केसेस येतील - अशाही तर केसेस येतील जे एखाद्या नियमांच्या चक्रात गुंतले गेले, वस्तुतः गुन्हेगार नाहीत, अपराधी नाहीत, गुंतले गेले आहेत. तेव्हा तू आपली बुद्धी लाऊन त्या निरपराध्याला वाचवायचे आहे, अशाच केसेस घे. असे तर खूप थोडेसे येतील गुरुजी! ठीक आहे, खूप थोडे येतील तर काय झाले? असे घेऊन तर पाहा. मान्य केले. वर्षभर त्याने अशाच केसेस घेतल्या. त्यामुळे त्याची अशी प्रसिद्धी झाली की तो अशी केस घेणारच नाही जी खोटी आहे. तेव्हा ज्या खऱ्या केसेस आहेत, त्या त्याच्याजवळ जास्त येऊ लागल्या आणि त्याने घेतलेल्या अशा केसेस कोर्टात जातील तेव्हा तो कधी हारणार नाही. प्रत्येक न्यायाधीश या बाबीला जाणतो की हा प्रथम नीट तपासून पाहातो की यात धोका तर नाही. हा खरोखर निरपराध आहे ना! आणि बिचाऱ्याला कुठेतरी गुंतवले जात आहे. आता तो केस घेईल व लढेल आणि प्रत्येक परिस्थितीत जिंकेल. त्याचे काम पूर्वीपेक्षा जास्त मोठ्या प्रमाणात चालू लागले. अरे, धर्म मदत करेलच. आमच्यात साहस असले पाहिजे.

खूप मंगल होवो ! ( प्रश्नोत्तर क्रमशः...)

----------------------

## अनेक स्थानांवर आचार्य स्वयंशिबिर संपन्न

पूज्य माताजीसोबत अनेक विपश्यना केंद्रावर लागलेल्या आचार्य स्वयंशिबिरांच्या सफलतेचे समाचार प्राप्त झाले आहेत. यामुळे न केवळ साधकांना खूप लाभ प्राप्त झाला आहे, तर केंद्रांनाही धर्माच्या तीव्र तरंगांचा लाभ प्राप्त झाला. **सर्वांचे मंगल होवो !**

-----

Registered No. NSK/271/2014-2016

## पाली प्रशिक्षण कार्यक्रम - २०१५, विपश्यना विशोधन विन्यास, ग्लोबल विपश्यना पॅगोडा, मुंबई

१. एका महिन्याचा निवासीय सघन पाली-हिंदी पाठ्यक्रम- १० जानेवारी ते १२ फेब्रुवारी,
२. उच्च पाली-व्याकरण कार्यशाळा- १३ ते १७ फेब्रुवारी,
३. पाली वाचणे-लिहिणे शिकणे (-ब्रह्मदेशी, रोमन व देवनागरीत) - १० ते १९ मे,
४. पाली-इंग्रजी सघन निवासीय पाठ्यक्रम - २५ मे ते ९ ऑगस्ट,
५. अनुवाद कार्यासाठी कार्यशाळा - १० ते १७ ऑगस्ट,
६. अशोकाचे शिलालेख व ब्रह्मी लिपी कार्यशाळा - १ ते ५ आक्टोंबर,
७. उच्च पाली-व्याकरण कार्यशाळा - ३ ते १४ नोव्हेंबर,
८. शोध-प्रणालीवर कार्यशाळा - १५ ते १९ नोव्हेंबर,

**या कार्यक्रमात भाग घेण्याची पात्रता (योग्यता) -**

अ) ज्यांनी कमीतकमी तीन १०-दिवसीय व एक सतिपट्ठान शिबिर केले असेल.
ब) स्नातक डिग्री वा १५ वर्षांपर्यंत शाळेचा पाठ्यक्रम पूर्ण केला असेल.
क) अनुवाद व पाली-व्याकरणासाठी - ज्यांनी वि.वि.वि. द्वारे संचालित निवासीय पाली-पाठ्यक्रम पूर्ण केला असेल वा पालीत स्नातकोत्तर डिग्री प्राप्त केली असेल.

**विन्यासाने खालील विषयांवर शोध कार्याचे आयोजन केले आहे --**

१. संत वाणीत विपश्यना, २) त्रिपिटकात आयुर्वेदिक तत्व,
३. विपश्यनेने बदल - तेव्हा व आता,

जर कोणी या विषयांवर काही काम केले असेल तर त्याचे स्वागत आहे.

**संपर्क-** ईमेल - mumbai@vridhamma.org;
फोन- ९१-२२-३३७४७५६०.

---

## मंगल मृत्यू

महासमुद्र, छत्तीसगडचे सहायक आचार्य ८० वर्षीय श्री ब्रह्मानंद गोयल यांनी २००० पासून सहायक आचार्याच्या रूपाने तुरुंगातील व इतर अनेक शिबिरांचे संचालन केले. ते मागील काही वर्षांपासून आजारी होते. त्यांनी १६ नोव्हेंबर १४ च्या रात्री शरीर त्याग केला.आपल्या सेवेच्या बळावर दिवंगताचे मंगलच होईल. धर्म परिवाराकडून श्रद्धांजली व मंगल मैत्री.

## सयाजी ऊ बा खिनांच्या पुण्यतिथीनिमित्त एक दिवसीय महाशिबिर

१८ जानेवारी २०१५ ला, **पूज्य माताजींच्या उपस्थितीत 'विश्व विपश्यना पॅगोड्यात' एक दिवसीय महाशिबिर होईल. शिबिर वेळ-** सकाळी **११** ते दुपारी **४** वाजेपर्यंत. येथे ३ वाजता गुरुदेवांच्या अस्थी विसर्जन व्हिडियो कार्यक्रमात साधना न केलेले लोकही बसू शकतात. नोंदणीसाठी कृपया खालील फोन नंबरांवर वा ईमेलने त्वरित संपर्क साधावा. कृपया नोंदणी केल्याविना येऊ नये व **समग्गानं तपोसुखो** -सामूहिक तपसुखाचा लाभ घ्यावा.

नोंदणी **संपर्क**:-फोन नं.:-०२२-२८४५११७०/ ०२२- ३३७४७५०१ -ext.9, ०२२-३३७४७५४३/३३७४७५४४, (**फोन नोंदणी** सकाळी **११** ते सायं **५** पर्यंत, रोज)
Online Registration: www.oneday. globalpagoda .org

**अतिरिक्त उत्तरदायित्व**
**आचार्य**

1-2. Mr. Ittiporn & Mrs. Monta Thong-innate, To serve as centre teachers for Dhamma Suvanna, Thailand.
3. Dr. Amnat Aplichatvulop, To serve as centre teachers for Dhamma Puneti, Thailand.

**वरिष्ठ सहायक आचार्य**

१-२. श्री सुनील व श्रीमती विद्या बागडे, धम्म भण्डार, भंडारासाठी केंद्र-आचार्याच्या रूपाने सेवा

**नवे उत्तरदायित्व**
**वरिष्ठ सहायक आचार्य**

१. श्री एस.पी. शर्मा, जयपुर
२. कु. शशि कमल, जयपुर
3. Mr. Yuth Itchayapruek, Thailand
4. Ms. Sa-nguanwong Khaowisoot, Thailand

**नव नियुक्ती**
**सहायक आचार्य**

१.श्री किशोर नातू, इगतपुरी
२. श्री अनिल माली, जलगांव
३. त्र्यंबक तायडे, मुंबई
4. Ms. Usana Patramontree, Thailand
5. Ms. Sirinart Nartwong, Thailand

**बालशिबिर-शिक्षक**

१. श्रीमती अर्चना भूतड़ा, औरंगाबाद
२. श्री दिनेश खोब्रागडे, भिलाई
३. श्रीमती नयना भालेराव, जलगांव
४. श्री भारती अरुण थोके, जलगांव
५. श्री शामसुंदर टेम्भारे, जलगांव
६. श्री रविकांत वासनिक, जलगांव
७. श्रीमती आशा सूद, जलगांव
८. श्रीमती मालती ई. गायकवाड,जल'
9. Mr. Renzo Conedera, Italy
10. Mr. Chi Tran, Australia

## दोहे धर्माचे

रूप शब्द रस रती हो, गंध स्पर्श हो प्रियस।
चाखे जेव्हा धर्म रस, हो सर्वच रस निरस।।
चाखताच धर्माचा रस, दुख द्वंद्व पडे मंद।
तहान, ज्वलन संपते, चित्ती भरे आनंद।।
धर्म चाख मन मुदित हो, अणु-अणु पुलकित होय।
धर्म वाटता मन मुदित, जन-जन हर्षित होय।।
सत्य दुजे न असू शके, सत्य सनातन एक।
दर्शन, ज्ञानाविना तर, कल्पित होय अनेक।।
मनी उठती विकार जर, पहा अभिमुख होऊन।
पाहत-पाहत पाहता, दुखरेष जाय मिटुन।।

## दोहे धर्माचे

किती दिवस असे गेले, करता वाद-विवाद।
त्याग तर्कास बावळटा, चाख धर्माचा स्वाद।।
सांगत ऐकत राहिला, केला न व्यवहार।
कथन, श्रवणच तर झाले, आता कर्मास धार।।
डोळ्यास पट्टी बांधून, वजन करी ना मोल।
तु तेल्याच्या बैलासम, फिरशी गोलच गोल।।
अंतरी शोध सोडून, पोथित शोधे ज्ञान।
सार हातात ये कसा? कुठे भटके नादान।।
पोकळ बुद्धिविलासात, जीवन दे गमवून।
विशुद्ध धर्माची ज्योती, ह्रदयी न जागवून।।

**श्री गोयन्काजी व विपश्यनेप्रती असीम कृतज्ञतेसह**
Email: - thetriplegems8@gmail.com

'विपश्यना विशोधन विन्यास' साठी प्रकाशक, मुद्रक व संपादकः राम प्रताप यादव, धम्मगिरी, इगतपुरी-422 403, दूरध्वनी : (02553) 244086, 244076.
मुद्रण स्थान : अक्षर चित्र प्रिंटिंग प्रेस, 69- बी रोड, सातपूर, नाशिक-422 007. **बुद्धवर्ष 2558, मार्गशीर्ष पौर्णिमा, 6 डिसेंबर, 2014**

वार्षिक शुल्क रु. **30/-**, US $ 10, आजीवन शुल्क रु. **500/-**, US $ 100. **Registered No. NSK/271/2014-2016**

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.)

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244076, 244086, 243712, २४३२३८. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org